# महाराष्ट्र शासन

क्रमांक: सीएस/टिपीबी४३१३/३५/नवि-११
नगर विकास विभाग, निर्मल भवन, २ रा मजला,
नरिमन पॉईन्ट, मुंबई : ४०० ०२१.
दिनांक : २ /११/२०१३

प्रति,

१) **प्रधान सचिव (कामगार)**
मंत्रालय, मंबई-३२.

२) **प्रधान सचिव (गृहनिर्माण)**
मंत्रालय, मुंबई-३२.

३) **आयुक्त,**
कोकण विभाग, कोकण भवन,
नवी मुंबई-४००६१४.

४) **अध्यक्ष,**
एमसीएचआय-क्रेडाई (मुंबई)

५) **जिल्हाधिकारी,**
मुंबई शहर, जुने जकात घर,
डी.डी.बिल्डींग, फोर्ट, मुंबई.

६) **जिल्हाधिकारी,**
मुंबई उपनगर जिल्हा,
वांद्रे (पुर्व), मुंबई.-५१.

७) **जिल्हाधिकारी,**
ठाणे.

८) **जिल्हाधिकारी,**
रायगड-अलिबाग.

**विषय – Meeting Regarding Construction workers.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/१०/२०१३ रोजी पार पडलेली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी यासोबत जोडलेले आहे.

**आपला,**

(संजय बाणाईत )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सोबत – वरील प्रमाणे.**

D:\CAMP UD-११\UD-११\MEETING\LETTER.Doc

**मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे दि. २४/१०/२०१३ रोजी सायंकाळी ६.०० वा. आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

---

**विषय — बांधकाम मजूरांच्या गृहनिर्माण व इतर सुविधा अनुषंगाने बैठक.**

सदर बैठकीस खालील अधिकारी/ पदाधिकारी उपस्थित होते.

१) श्री. अरविंद कुमार, प्रधान सचिव, कामगार विभाग.

२) श्री. देबाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव, गृहनिर्माण.

३) श्रीमती वल्सा सिंग, अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

४) श्री. राधेश्याम मोपलवार, विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

५) श्री. एस.एस. हुसेन , मुख्य कार्यकारी अधिकारी , महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रिज- क्रेडाई, मुंबई.

६) श्री. सं. र. कुर्वे, उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई ( संचालक, नगर रचना यांचेकरीता ),

७) श्री. विमल शहा.

| अ. क्र. | बैठकीतील चर्चा व निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारे प्राधिकरण | अंमलबजावणीचा कालावधी |
|---|---|---|---|
| १) | मुंबई महानगर प्रदेशामधील बांधकाम मंजूरांच्या गृहनिर्माणासाठी तसेच त्यांच्या शाळा, प्रशिक्षण संस्था इत्यादी सुविधांसाठी एकूण सुमारे १०० एकर जागेची आवश्यकता आहे. जेणेकरुन अंदाजे ७०,००० कामगारांच्या रहाण्याची सोय होईल. त्याकरीता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची आवश्यकता नाही. तसेच सदर सदनिकांसाठी HDFC वगैरे संस्था त्यांना कर्ज देणेस तयार असलेचे प्रतिपादन MCHI कडून करणेत आले.<br>यासंदर्भात उपलब्ध होवू शकणाऱ्या जागांसंदर्भात विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून माहिती घेवून शासन मान्यतेने निर्णय घेणेचे ठरले. | आयुक्त कोकण विभाग | २९/१०/२०१३ |
| २) | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भाडे तत्वावरील योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या सदनिकांपैकी नागरी स्थानिक प्राधिकरणांना संक्रमण शिबिरांसाठी द्यावयाच्या सदनिका तसेच गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करुन दयावयाच्या सदनिका याव्यतिरिक्त जवळपास १०,००० सदनिका बांधकाम मजूरांसाठी MCHI ला उपलब्ध करुन देण्याबाबत शासन मान्यतेने विचार करता येऊ शकेल, अशी चर्चा झाली. त्यासाठी MCHI व MMRDA च्या प्रतिनिधींनी मुंबई महानगर प्रदेशात भाडेतत्वावरील योजने अंतर्गत मंजूर प्रकल्पांना भेट देऊन यादृष्टीने उपयुक्त प्रकल्पांची यादी तयार करावी. याकामी झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरिता दिनांक २९/१०/२०१३ रोजी १.०० वाजता बैठक आयोजित करावी. | एमसीएचआय व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | दोन दिवस |

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

***********